भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# हुंडा प्रतिबंध अधिनियम, १९६१

**(सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २८)**

[दिनांक ३१ मार्च, २००१ रोजी यथाविद्यमान]

# The Dowry Prohibition Act, 1961

**(Act No. 28 of 1961)**

**[ As in force on the 31st March, 2001]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ५.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ मार्च, २००१ रोजी यथाविद्यमान असलेल्या दि डॉवरी प्रोहिबिशन ॲक्ट, १९६१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक २, दिनांक २८ ऑगस्ट, २००३ यात पृष्ठ १४१ ते १४५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २ खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

डॉ सुभाष चंद्र जैन,
सचिव, भारत सरकार.

नवी दिल्ली,
दिनांक : २८ ऑगस्ट, २००३.

## PREFACE

This edition of the Dowry Prohibition Act, 1961 as on the 31st March 2001, contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part-XII, Section-1, No. 2, Volume 12, dated 28th August 2003 on pages 141 to 145.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws), Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

Dr. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

New Delhi,
Dated 28th August 2003.

# हुंडा प्रतिबंध अधिनियम, १९६१

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. "हुंडा" याची व्याख्या.
३. हुंडा देण्याबद्दल किंवा घेण्याबद्दल शास्ती.
४. हुंडा मागण्याबद्दल शास्ती.
४क. जाहिरातींवर बंदी.
५. हुंडा देण्याचा किंवा घेण्याच्या करार शुन्य असावयाचा.
६. हुंडा पत्नीच्या किंवा तिच्या वारसांच्या हितार्थ असावयाचा.
७. अपराधांची दखल घेणे.
८. अपराध हे विवक्षित प्रयोजनांसाठी दखलपात्र आणि जामीनयोग्य असणे आणि आपसात मिटवण्याजोगे नसणे.
८क. विवक्षित खटल्यांमध्ये शाबितीचा भार.
८ख. हुंडा प्रतिषेधी अधिकारी.
९. नियम करण्याची शक्ती.
१०. नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

शब्दसूची—
इंग्रजी—मराठी.
मराठी—इंग्रजी.

# [1]हुंडा प्रतिबंध अधिनियम, १९६१

## [१९६१ चा अधिनियम क्रमांक २८]

(३१ मार्च, २००१ रोजी यथाविद्यमान)

[२० मे, १९६१]

**हुंडा देण्यास किंवा घेण्यास प्रतिबंध करण्यासाठी अधिनियम**

भारतीय गणराज्याच्या बाराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास "हुंडा प्रतिबंध अधिनियम, १९६१" असे म्हणता येईल.

(२) जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून, संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

(३) केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [2]दिनांकास तो अंमलात येईल.

**"हुंडा" याची व्याख्या.**

२. या अधिनियमात "हुंडा" याचा अर्थ,—

(क) विवाहातील एका पक्षाने विवाहातील अन्य पक्षास, किंवा

(ख) विवाहातील कोणत्याही पक्षाच्या मातापित्यांनी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने विवाहातील कोणत्याही पक्षास किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस,

[3][उक्त पक्षांच्या विवाहाच्या संबंधात] विवाहाच्या वेळी किंवा पूर्वी [4][किंवा विवाहानंतर कोणत्याही वेळी] प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे दिलेली किंवा देण्याचा करार केलेली कोणतीही संपत्ती किंवा मूल्यवान रोखा, असा आहे, पण ज्यांना मुस्लिम व्यक्तिगत कायदा (शरीअत) लागू आहे त्या व्यक्तींच्या बाबतीत, त्यात देन किंवा महरचा समावेश नाही.

[5]* * * * * * *

**स्पष्टीकरण दोन.**—"मूल्यवान रोखा" या शब्दप्रयोगाला "भारतीय दंड संहिते" च्या कलम ३० मध्ये जो अर्थ दिलेला आहे, तोच आहे.

**हुंडा देण्याबद्दल किंवा घेण्याबद्दल शास्ती.**

३. [6][(१)] जर कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, हुंडा दिला अथवा घेतला अथवा तो देण्यास किंवा घेण्यास अपप्रेरणा दिली तर ती [7][[8][पाच वर्षांपेक्षा] कमी नसेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि पंधरा हजार रुपये किंवा अशा हुंड्याची रक्कम यांपैकी जी रक्कम जास्त असेल त्या रकमेपेक्षा कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाच्या] शिक्षेस पात्र असेल :

परंतु, न्यायालय न्यायनिर्णयात पुरेशी व विशेष कारणे नमूद करून, [9][पाच वर्षांपेक्षा] कमी मुदतीची कारावासाची शिक्षा ठोठावू शकेल.

[10][(२) पोटकलम (१) मधील कोणताही मजकूर पुढील गोष्टींना किंवा त्यांच्या संबंधात लागू होणार नाही :—

(क) विवहाच्या वेळी वराला देण्यात येणारा (त्याबाबतीत कोणतीही मागणी न केलेला) अहेर :

परंतु, असा अहेर, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांस अनुसरून ठेवण्यात येणाऱ्या यादीत नोंदलेला असेल.

---

१. १९६८ चा अधिनियम २६-क (१) व अनुसूचीद्वारे पाँडेचेरी या राज्यक्षेत्रावर विस्तार केला.

२. १ जुलै, १९६१ पहा : अधिसूचना क्र. एस. ओ. १४१०, दिनांक २० जून, १९६१, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, कलम ३ (२)—पृष्ठ १००५.

३. १९८४ चा अधिनियम ६३, कलम २(क) द्वारे "उक्त पक्षांच्या विवाहाचे प्रतिफल म्हणून" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून)

४. १९८६ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "किंवा विवाहानंतर" या मजकुराऐवजी "विवाहानंतर कोणत्याही वेळी" हा मजकूर दाखल करण्यात आला (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

५. १९८४ चा अधिनियम ६३, कलम २(ख) द्वारे हे स्पष्टीकरण वगळण्यात आले (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे कलम ३ ला पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

७. १९८६ चा अधिनियम ४३, कलम ३(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. १९८६ चा अधिनियम ४३, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

९. १९८६ चा अधिनियम ४३, कलम ३ (ख) द्वारे "सहा महिने" याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

१०. १९८४ चा अधिनियम ६३, कलम ३(ख) द्वारे पोट कलम समाविष्ट करण्यात आले (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

(ख) विवाहाच्या वेळी वधूला देण्यात येणारा (त्या बाबतीत कोणतीही मागणी न केलेला) अहेर :

परंतु असा अहेर या अधिनियमाखाली केलेल्या नियमांस अनुसरून ठेवण्यात येणाऱ्या यादीत नोंदलेला असेल:

परंतु आणखी असे की, असा अहेर वराने किंवा त्यांच्या वतीने किंवा वराशी संबंधित कोणाही व्यक्तीने दिलेला असेल त्या बाबतीत, असा अहेर नेहमीच्याच प्रथेनुसार दिला जाणारा असेल आणि त्याचे मूल्य तो जिच्याकडून किंवा जिच्या वतीने दिला जाईल, त्या व्यक्तीची आर्थिक स्थिती विचारात घेता, अधिक असणार नाही.]

**हुंडा मागण्याबद्दल शास्ती.** [1][४. कोणत्याही व्यक्तीने, वधूच्या किंवा वराच्या मातापित्याकडून किंवा इतर नातेवाईकांकडून किंवा पालकांकडून, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही हुंडा मागितल्यास ती सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल पण दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल :

परंतु, न्यायालय न्यायनिर्णयात पुरेशा व विशेष कारणांचा उल्लेख करून, सहा महिन्यांपेक्षा कमी मुदतीच्या कारावासाची शिक्षा ठोठावू शकेल.]

**जाहिरातींवर बंदी.** [2][४क. कोणतीही व्यक्ती,—

(क) आपल्या मुलाच्या किंवा मुलीच्या किंवा इतर नातेवाईकांच्या विवाहाच्या प्रीत्यर्थ कोणत्याही एखाद्या वृत्तपत्रात, नियतकालिकात, कालिकात कोणत्याही जाहिरातीद्वारे किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे आपल्या संपत्तीमधील हिस्सा किंवा पैशाचा कोणताही भाग किंवा दोन्हीही धंद्यातील किंवा इतर हितसंबंधातील हिस्सा म्हणून देऊ करील.

(ख) खंड (क) मध्ये निर्देशलेली कोणतीही जाहिरात मुद्रित करील, प्रकाशित करील किंवा प्रस्तुत करील तर,

ती, सहा महिन्यांपेक्षा कमी नाही परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा पंधरा हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल :

परंतु, न्यायालय, न्यायनिर्णयात पुरेशी व विशेष कारणे नमूद करून, सहा महिन्यांपेक्षा कमी इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा ठोठावू शकेल.]

**हुंडा देण्याचा किंवा घेण्याचा करार शून्य असावयाचा.** ५. हुंडा देण्याचा किंवा घेण्याचा कोणताही करार शून्य असेल,.

**हुंडा पत्नीच्या किंवा तिच्या वारसांच्या हितार्थ असावयाचा.** ६. (१) जिचा विवाह असेल तिच्या व्यतिरिक्त अन्य एखाद्या व्यक्तीने हुंडा प्राप्त केला असेल तर,—

(क) हुंडा विवाहापूर्वी मिळाला असल्यास, विवाहाच्या दिनांकानंतर [3][तीन महिन्यांच्या] आत, किंवा

(ख) हुंडा विवाहाच्या वेळी किंवा नंतर मिळाला असल्यास, तो मिळाल्याच्या दिनांकानंतर [3][तीन महिन्यांच्या] आत, किंवा

(ग) ती स्त्री अज्ञान असताना हुंडा मिळाला असल्यास, ती अठरा वर्षे वयाची झाल्यानंतर [3][तीन महिन्यांच्या] आत,

ती व्यक्ती त्या स्त्रीकडे तो हस्तांतरित करील व असे हस्तांतरण होईपावेतो त्या स्त्रीच्या हितार्थ न्यास म्हणून धारण करील.

[4][(२) जर कोणतीही व्यक्ती पोटकलम (१) द्वारे [5][किंवा पोट कलम (३) द्वारे] आवश्यक केल्याप्रमाणे, त्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत, संपत्ती हस्तांतरित करण्यात कसूर करील तर ती व्यक्ती, सहा महिन्यांपेक्षा कमी नाही परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या शिक्षेस किंवा [6][पाच हजार रुपयांपेक्षा कमी नाही परंतु दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या] द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.]

---

१. १९८४ चा अधिनियम ६३, कलम ४ द्वारे, मूळ कलम ४ ऐवजी दाखल करण्यात आले. (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

२. १९८६ चा अधिनियम ४३, कलम ४ द्वारे नवीन कलम ४क समाविष्ट करण्यात आले (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. १९८४ चा अधिनियम ६३, कलम ५ (क्) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ५(ख) द्वारे मूळ पोटकलम (२) ऐवजी हे पोट कलम दाखल करण्यात आले (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

५. १९८६ चा अधिनियम ४३, कलम ५ (क्) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट केला (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ५ (क्) (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

(३) जेथे पोटकलम (१) खाली कोणत्याही संपत्तीस हक्कदार असलेली स्त्री संपत्ती मिळण्यापूर्वी मृत्यू पावेल तेथे, त्या स्त्रीचे वारस ती संपत्ती त्या त्या काळी धारण करत असलेल्या व्यक्तीकडून मागण्यास हक्कदार असतील ;

[1][परंतु जेव्हा अशी स्त्री तिच्या विवाहापासून सात वर्षांच्या आत, नैसर्गिक कारणाहून अन्य कारणामुळे मृत्यू पावेल, त्याबाबतीत, अशी संपत्ती,

(क) जर तिला अपत्ये नसतील, तर तिच्या पालकांकडे हस्तांतरित होईल, किंवा

(ख) जर तिला अपत्ये असतील, तर अशा अपत्यांकडे हस्तांतरित होईल आणि असे हस्तांतरण होईपर्यंत अशा अपत्यांसाठी ती न्यास म्हणून धारण करता येईल.]

[2][(३क) पोटकलम (१) [3][किंवा पोटकलम (३)] अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे कोणतीही संपत्ती हस्तांतरित करण्यात कसूर केल्याबद्दल दोषी ठरवलेल्या व्यक्तीने, पोटकलम (२) खाली तिला दोषी ठरविण्यापूर्वी, त्या संपत्तीस हक्कदार असलेल्या स्त्रीला किंवा तिच्या [4][वारसाला किंवा पालकांना किंवा मुलांना], अशा संपत्तीचे हस्तांतरण केले नसेल त्याबाबतीत, न्यायालय, त्या कलमाखाली शिक्षा देण्याशिवाय आणखी, लेखी आदेशाद्वारे असा निदेश देईल की, अशी व्यक्ती त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळेच्या आत, अशा स्त्रीकडे किंवा, यथास्थिति, तिच्या [4][वारसाकडे किंवा पालकांकडे मुलांकडे] किंवा संपत्ती हस्तांतरित करील आणि अशारीतीने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत आदेशांचे पालन करण्यात ती व्यक्ती कसूर करील तर त्या संपत्तीच्या मूल्याएवढी रक्कम, अशा न्यायालयाने जणू काही द्रव्यदंड लादला असल्याप्रमाणे, वसूल करण्यात यावी आणि ती अशा स्त्रीला किंवा, यथास्थिति तिच्या [4][वारसांना किंवा पालकांना किंवा मुलांना] ती देण्यात यावी.

(४) या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट कलम ३ किंवा कलम ४ च्या उपबंधावर परिणाम करणार नाही.

[5][७. "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" (१९७४ चा २) यात काहीही अंतर्भूत असले तरी,— **अपराधांची दखल घेणे.**

(क) इलाखा-शहर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाहून कनिष्ठ असलेले कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

(ख) कोणतेही न्यायालय—

(एक) स्वतःला माहिती असल्यावरून किंवा अशा अपराधामागील तथ्यांच्या पोलिसी अहवालावरून ; किंवा

(दोन) अपराधामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीने किंवा अशा व्यक्तीच्या पालकांनी किंवा इतर नातेवाईकांनी किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त कल्याण संस्थेने किंवा संघटनेने तक्रार केल्यावरून असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमाखालील अपराधाची दखल घेणार नाही;

(ग) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धपराधी ठरवलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केलेला कोणताही शिक्षादेश पारित करणे हे कायदेशीर असेल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "मान्यताप्राप्त कल्याणकारी संस्था किंवा संघटना" याचा अर्थ, केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने याबाबतीत मान्यता दिलेली एखादी सामाजिक कल्याणकारी संस्था किंवा संघटना, असा आहे.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या प्रकरण ३६ मधील कोणताही मजकूर या अधिनियमाखालील शिक्षापात्र अशा कोणत्याही अपराधाला लागू होणार नाही.]

[6][(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, अपराधाच्या परिणामी व्यथित झालेल्या व्यक्तिने केलेल्या निवेदनामुळे अशी व्यक्ती या अधिनियमाखालील अभियोगाच्या अधीन असणार नाही.]

---

१. सन् १९८६ चा अधिनियम ४३, कलम ५ (ख) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले. (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).
२. १९८४ चा अधिनियम ६३, कलम ५ (घ) द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले. (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).
३. १९८६ चा अधिनियम ४३, कलम ५ (ग) (एक) द्वारे "किंवा पोटकलम (३)" हा मजकूर समाविष्ट करण्यात आला. (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).
४. वरील अधिनियमाच्या कलम ५ (ग) (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).
५. १९८४ चा अधिनियम ६३, कलम ६ द्वारे मूळ कलम ७ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले. (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).
६. १९८६ चा अधिनियम ४३, कलम ६ द्वारे पोटकलम २ नंतर हे कलम समाविष्ट करण्यात आले. (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

अपराध हे विवक्षित प्रयोजनांसाठी दखलपात्र आणि जामीन योग्य असणे आणि आपसात मिटवण्याजोगे नसणे.

[1][८. (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २), ही या अधिनियमाखालील अपराधांना, जणू काही ते अपराध दखली अपराध असल्याप्रमाणे, पुढील प्रयोजनांच्या बाबतीत लागू होईल:—

(क) अशा अपराधांचे अन्वेषण आणि ;

(ख) (एक) संहितेच्या कलम ४२ मध्ये निर्देशिलेल्या बाबी ; आणि

(दोन) एखाद्या व्यक्तीला अधिपत्राशिवाय किंवा दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय अटक ;

या बाबी वगळून इतर प्रयोजने.

(२) या अधिनियमाखालील प्रत्येक अपराध हा [2][जामीन योग्य नसणे] आणि न मिटवण्याजोगा असेल.]

विवक्षित खटल्यांमध्ये शाबितीचा भार.

[3][८क. कलम ३ अन्वये कोणताही हुंडा घेण्याबद्दल किंवा घेण्याला प्रोत्साहन देण्याबद्दल किंवा कलम ४ अन्वये हुंड्याची मागणी करण्याबद्दल जेव्हा कोणत्याही व्यक्तीवर खटला चालू असेल त्याबाबतीत तिने या कलमान्वये अपराध केलेला नाही हें सिद्ध करण्याचा भार त्या व्यक्तीवर राहील.

हुंडा प्रतिषेधी अधिकारी.

८ख. (१) राज्य शासन त्यास योग्य वाटतील तितके हुंडा प्रतिषेधी अधिकारी नियुक्त करू शकेल आणि या अधिनियमाखालील अधिकारिता व शक्ती यांचा वापर ते ज्या क्षेत्राच्या बाबतीत करतील ती क्षेत्रे विनिर्दिष्ट करू शकेल.

(२) प्रत्येक हुंडा प्रतिषेधी अधिकारी पुढील शक्तींचा वापर करील व कामे पार पाडील :—

(क) या अधिनियमाच्या उपबंधांचे पालन होत आहे हे पाहणे ;

(ख) हुंडा घेणे किंवा तो घेण्यास प्रोत्साहन देणे किंवा हुंड्याची मागणी करणे या गोष्टींना शक्य होईल तेथवर प्रतिबंध करणे ;

(ग) या अधिनियमाखालील अपराध करणाऱ्या व्यक्तींवर खटला भरण्यासाठी शक्य असेल असा पुरावा गोळा करणे ;

(घ) राज्य शासनाकडून त्याचेकडे सोपवण्यात येतील अशी किंवा या अधिनियमांन्वये केलेल्या नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी अतिरिक्त कामे पार पाडणे.

(३) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा पोलिस अधिकाऱ्याच्या शक्ती हुंडा प्रतिषेधी अधिकाऱ्याला प्रदान करु शकेल आणि तो अधिकारी या अधिनियमाद्वारे केलेल्या नियमाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा मर्यादांच्या व शर्तींच्या अधीनतेने अशा शक्तीचा वापर करील.

(४) राज्य शासन, हुंडा प्रतिषेधी अधिकाऱ्यांना त्यांची या अधिनियमाखालील कामें कार्यक्षमरित्या पार पाडण्यात सल्ला देण्याच्या आणि मदत करण्याच्या प्रयोजनासाठी, असे हुंडा प्रतिषेधी अधिकारी ज्या क्षेत्रात पोटकलम (१) खालील अधिकारितेचा वापर करीत असतील त्या क्षेत्रातील, पाचपेक्षा अधिक नसतील इतक्या समाजकल्याण कार्यकर्त्यांच्या (त्यापैकी किमान दोन महिला कार्यकर्त्या असतील) सल्लागार मंडळाची नियुक्ती करू शकेल.]

नियम करण्याची शक्ती.

९. (१) केंद्र सरकारला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करता येतील.

[4][(२) विशेष करून आणि पूर्वगामी शक्तींच्या, सर्वसाधारणतेला बाध न येता, अशा नियमात पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येतील.

(क) कलम ३ च्या पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या भेट वस्तूंची कोणतीही यादी ज्या नमुन्यात व ज्या रीतीने आणि ज्या व्यक्तीकडून ठेवण्यात येईल तो नमुना, ती रीत व त्या व्यक्ती आणि त्याच्यांशी सबंधित अन्य सर्व बाबी ; आणि

(ख) या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधीचे धोरण व कार्यवाही यांमधील अधिक चांगला समन्वय. ]

---

१. १९८४ चा अधिनियम, ६३ कलम ७ द्वारे मूळ कलम ८ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले. (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

२. १९८६ चा अधिनियम ४३, कलम ७ द्वारे मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले. (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे कलम ८क व कलम ८ख समाविष्ट करण्यात आले. (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

४. १९८४ चा अधिनियम ६३, कलम ८ द्वारे पोटकलम (२) समाविष्ट करण्यात आले. (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

[१][(३)] या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर एका सत्राने [२][किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक सत्राने मिळून बनलेल्या अशा एकूण ३० दिवसांच्या कालावधीकरिता संसद सत्रासीन असताना तिच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या सत्रात तो याप्रमाणे ठेवण्यात आला ते किंवा त्याच्या निकटनंतरचे सत्र संपण्यापूर्वी] जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर, यथास्थिति, अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल, किंवा मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, त्यायोगे अशा कोणत्याही अपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे त्या नियमाखाली पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधीग्राह्यतेस बाध येणार नाही.

**नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.**

[३][१०. (१) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करू शकेल.

(२) विशेषत: आणि पुर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी नियम करता येतील, त्या बाबी अशा :—

(क) हुंडा प्रतिषेधी अधिकाऱ्याने कलम ८ख च्या पोटकलम (२) खाली पार पाडावयाची अतिरिक्त कामे ;

(ख) हुंडा प्रतिषेधी अधिकाऱ्याने कलम ८ख च्या पोटकलम (३) अन्वये ज्या मर्यादांच्या आणि शर्तींच्या अधीनतेने कामे पार पाडावयाची त्या मर्यादा व त्या शर्ती ;

(३) राज्य शासनाने या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल. ]

---

१. १९८४ चा अधिनियम ६३, कलम ८ द्वारे पूर्वीच्या पोटकलम (२) ला पोटकलम (३) असा नवीन क्रमांक देण्यात आला. (२ ऑक्टोबर, १९८५ रोजी व तेव्हापासून).

२. १९८३ चा अधिनियम २०, कलम २ व अनुसूचीद्वारे विशिष्ट शब्दांसाठी हा मजकूर दाखल करण्यात आला. (१५ मार्च, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. १९८६ चा अधिनियम ४३, कलम ९ द्वारे मूळ कलम १० ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले. (१९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

# THE DOWRY PROHIBITION ACT, 1961
# हुंडा प्रतिबंध अधिनियम, १९६१

## इंग्रजी—मराठी शब्दसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| abet | .. | —स अपप्रेरणा देणे | .. | [S. 3] |
| absolve | .. | —ला मुक्त करणे | .. | [S. 6 (3)] |
| agree | .. | —चे मतैक्य होणे | .. | [S. 9 (2)] |
| agreement | .. | करार | .. | [S. 5] |
| benefit | .. | हित | .. | [S. 6(title)] |
| carry out | .. | ची अंमलबजावणी करणे | | |
| claim | .. | मागणे | .. | [S. 6 (3) ] |
| complaint | .. | तक्रार | .. | [S. 7 (b) (ii) ] |
| deem | .. | मानणे | .. | [S. 2-expl.-I] |
| directly | .. | प्रत्यक्षपणे | .. | [S. 2] |
| dower | .. | देन | .. | [S. 2 (b) ] |
| dowry | .. | हुंडा | .. | [long title] |
| dowry prohibition | .. | हुंडा प्रतिबंध | .. | [title] |
| entitle | .. | हक्कदार करणे | .. | [S. 6 (3) ] |
| fine | .. | द्रव्यदंड | .. | [S. 3] |
| giving of dowry | .. | हुंडा देणे | .. | [long title] |
| have effect | .. | परिणामक असणे | .. | [S. 9 (2) ] |
| heir | .. | वारस | .. | [S. 6 (title) ] |
| hold in trust | .. | न्यास म्हणून धारण करणे | .. | [S. 6 (C) ] |
| immediately following | .. | निकट नंतरचा | .. | [S. 9(2) ] |
| imprisonment | .. | कारावास | .. | [S. 3] |
| indirectly | .. | अप्रत्यक्षपणे | .. | [S. 2] |
| | | | | [S. 9 (2) ] |
| law (Shariat) | .. | कायदा (शरीअत) | .. | [S. 2 (b) ] |
| magistrate | .. | दंडाधिकारी | .. | [S. 7 (a) ] |
| mahr | .. | महर | .. | [S. 2 (b) ] |
| minor | .. | अज्ञान | .. | [S. 6 (c) ] |
| Muslim Personal | .. | मुस्लिम व्यक्तिगत | .. | [S. 2 (b) ] |
| non-compoundable | .. | आपसात मिटवण्याजोगे नसणे | .. | [S. 8 (title) ] |
| ornaments | .. | दागिने | .. | [S. 2 expl. 1] |
| parents | .. | मातापिता | .. | [S. 4] |
| parliament | .. | संसद | .. | [short title] |
| party | .. | पक्ष | .. | [S. 2 (a) ] |
| pass | .. | पारित करणे | .. | [S. 7 (C) ] |
| penalty | .. | शास्ती | .. | [S. 3 (title) ] |
| present | .. | अहेर | .. | [S. 3 (2) (a) ] |
| prohibit | .. | प्रतिबंध करणे | .. | [long title] |
| prohibition | .. | प्रतिबंध | .. | [ title ] |
| property | .. | संपत्ती | .. | [ S. 2 ] |
| removal of doubts | .. | शंकानिरसन | .. | [S. 2-expl.-I] |
| Republic of India | .. | भारतीय गणराज्य | .. | [preamble ] |
| require | .. | फर्मावणे | .. | [S.6 (2) ] |
| sentence | .. | शिक्षादेश | .. | [S. 7 (C) ] |
| session | .. | सत्र | .. | [S. 9 (2) ] |
| taking of dowry | .. | हुंडा घेणे | .. | [long title] |
| trust | .. | न्यास | .. | [S. 6 (C) ] |
| valuable security | .. | मूल्यवान रोखा | .. | [S. 2] |

## हुंडा प्रतिबंध अधिनियम, १९६१
## THE DOWRY PROHIBITION ACT, 1961

### मराठी—इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अज्ञान | minor | [क.६ (ग)] |
| अपप्रेरणा देणे | abet | [क.३] |
| अप्रत्यक्षपणे | indirectly | [क २] |
| अहेर | present | [क ३ (२) (क्)] |
| आपसात मिटवण्याजोगे नसणे | non-compoundable | [क. ८ (शीर्षक)] |
| आबंधन | obligation | [क. ६ (२)] |
| करार | agreement | [क. ५] |
| कायदा (शरीअत) | Law (shriat) | [क. २. (ख्)] |
| कारावास | imprisonment | [क. ३] |
| —ची अंमलबजावणी करणे | carry out | [क. ९(१)] |
| —चे मतैक्य होणे | agree | [क. ९ (३)] |
| घोषित करणे | declare | [क. २-स्पष्टी. एक] |
| —च्या शिक्षेस पात्र | punishable with | [क. ३] |
| तक्रार | complaint | [क. ७(ख्) (दोन)] |
| दंडाधिकारी | magistrate | [क. ७ (क्)] |
| दागिने | ornaments | [क. २-स्पष्टी. एक] |
| देन | dower | [क. २ (ख्)] |
| द्रव्यदंड | fine | [क. ३] |
| निकटनंतरचा | immediately following | [क. ९(२)] |
| न्यास | trust | [क. ६ (ग्)] |
| न्यास म्हणून धारण करणे | hold in trust | [क. ६ (ग्)] |
| पक्ष | party | [क. २ (क्)] |
| परिणामक असणे | have effect | [क. ९ (३)] |
| पारित करणे | pass | [क. ७ (ग्)] |
| प्रतिबंध करणे | prohibit | [दीर्घ शीर्षक] |
| प्रतिबंध | prohibition | [शीर्षक] |
| प्रत्यक्षपणे | directly | [क. २] |
| फर्मावणे | require | [क. ६ (२)] |
| भारतीय गणराज्य | Republic of India | [प्रास्ताविक] |
| महर | mahr | [क. २ (ख्)] |
| मागणे | claim | [क. ६ (३)] |
| मातापिता | parents | [क. ४] |
| मानणे | deem | [क. २ स्पष्टी. एक] |
| मुस्लिम व्यक्तिगत | Muslim Personal | [क. २ (ख्)] |
| मूल्यवान रोखा | valueable security | [क. २] |
| रोकड | cash | [क. २ स्पष्टी-दोन] |
| —ला मुक्त करणे | absolve | [क. ६ (२)] |
| —वयाचा होणे | attain the age of | [क. ६ (ग्)] |
| वारस | heir | [क. ६-शीर्षक] |
| शंकानिरसन | removal of doubts | [क. २-स्पष्टी-एक] |
| शास्ती | Penalty | [क. ३-शीर्षक] |
| शिक्षादेश | sentence | [क. ७ (ग)] |
| सत्र | session | [क. ९ (२)] |
| संपत्ती | property | [क. २] |
| संसद | parliament | [प्रास्ताविक] |
| हक्कदार करणे | entitle | [क. ६ (३)] |
| हित | benefit | [क. ६-शीर्षक] |
| हुंडा | dowry | [दीर्घ शीर्षक] |
| हुंडा घेणे | taking of dowry | [दीर्घ शीर्षक] |
| हुंडा देणे | giving of dowry | [दीर्घ शीर्षक] |
| हुंडा प्रतिबंध | dowry prohibition | [शीर्षक] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई